**नियमित दिवाणी दावा क्रमांक १०१४/२०१५**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१५१९-२०१५)

**<u>निशाणी क्रमांक ७४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी परवानगीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे अर्जांतील कथन थोडक्यात असे :- त्यांनी सदरचा दावा वाटप, निरंतर मनाई हुकूम व इतर तदअनुषांगिक दादीकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हे दिनांक १४.१२.२०२३ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याकरिता अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादींनी केली आहे.

३. प्रतिवादींनी त्याच अर्जांवर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, अर्जास पुरेसे कारण नाही तसेच झालेल्या विलंबाचे अर्जातील नमुद कारण संयुक्तिक नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले, तसेच दाखल कागदपत्रे पडताळुन पाहिली असता असे दिसुन येते की, वादी यांनी सदरचा दावा वाटप, निरंतर मनाई हुकुम व इतर तदअनुषांगीक दादीकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हे दिनांक १४.१२.२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेणे विलंब झालेला आहे. मयत प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे

गरजेचे आहे त्याकरिता अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखी घेण्यास झालेला उशिर माफ करण्यात आलेला आहे तसेच त्यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश बाजूला सारण्यात आलेला आहे. त्यामुळे वादींवर खर्च लादुन प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते, सबब खर्च लादुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्या बाबतचा सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्च लादुन मंजुर करण्यात येत आहेत.

२. अर्जांमध्ये नमुद केलेले मयत प्रतिवादी क्र.१ वारस अभिलेखावर घेण्यास वादींना परवागनी देण्यात येते वादींनी तशी दुरूस्ती वादी यांनी वाद पत्रामध्ये सदर आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करण्याची आहे.

३. वादींनी उपरोक्त नमुद खर्चाची रक्कम प्रतिवादीं यांना देणे आहे.

BABAR SANGITA PUNDLIK

Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2024.12.21 16:29:35 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २१.१२.२०२४.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.